**(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर )**

**सर्वोच्च न्यायालय अहवाल (१९९६) २ एस. सी. आर. - ४६३-४६४**

**दिवाणी अपिलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ३६४४/१९९६.**

**राजस्थान राज्य**

**विरुद्ध**

**मेसर्स कल्याण सुंदरम सिमेंट इंडस्ट्रीज लिमिटेड आणि इतर .**

**फेब्रुवारी १२, १९९६**

**[के. रामास्वामी आणि जी. बी. पटनायक न्यायमूर्ती ]**

परक्राम्य संलेख अधिनियम ,१८८१ /भारतीय दंड संहिता, १८६०

कलम १३८/४२०—धनादेश न वटणे -वसुलीसाठी दाखल केलेले दावे - फौजदारी कार्यवाहीही सुरू-फौजदारी खटल्यांचा निपटारा होईपर्यंत दिवाणी खटल्यांच्या कार्यवाहीला उच्च न्यायालयाने स्थगिती देणे - असा निर्णय दिला - फौजदारी खटले प्रलंबित राहणे हा दिवाणी खटले चालविण्यास अडथळा ठरत नाही -म्हणून उच्च न्यायालयाने स्वीकारलेले तत्त्व योग्य नाही.

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक ३६४४/१९९६.

एस. बी. दिवाणी पुनरीक्षण याचिका क्रमांक २०९ /१९९४ मधील राजस्थान उच्च न्यायालयाच्या दिनांक १६.११.९४ च्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यासाठी - अरुणेश्वर गुप्ता, मनोज के. दास आणि कु. नमिता नरुला.

उत्तरवादींसाठी - अरुण जेटली, डी. ए. दवे, भास्कर प्रधान, कु. रुबी आहुजा, मिसेस. एम. करंजावाला, एस. एस. खंडुजा, बी. के. सतीजा आणि वाय. पी. धिंग्रा

न्यायालयाचा निर्णय याद्वारे देण्यात आला.

अनुमती देण्यात आली .

हे अपील दिवाणी पुनरीक्षण याचिका क्रमांक २०९/९४ मध्ये १६.११.१९९४ रोजी राजस्थान उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांच्या आदेशावरून विशेष परवानगीने उद्भवले आहे. सर्वसामान्यपणे, निविदा मागवल्यानंतर उत्तरवादी-कंपनीने १३.४.१९६९ रोजी प्रकल्प राबविण्याचा करार केला होता. त्यानंतर मे ते जुलै १९८९ या कालावधीतील तारखांचे, तीन पोस्ट डेटेड धनादेश, प्रत्येकी रु. ६,८७,१००/-रकमेचे देण्यात आले, त्यापैकी प्रत्येक धनादेश वटला नाही . सदर नोटीस बजावल्यानंतर वसुलीसाठी खटले दाखल करण्यात आले. त्याचबरोबर सी. सी क्रमांक २१९, २२० आणि २५४ /१९८९ या तीन तक्रारींमध्ये परक्राम्य संलेख अधिनियमाच्या

कलम १३८ अन्वये आणि भादंवि कलम ४२० अन्वये कारवाई सुरू करण्यात आली. फौजदारी खटल्यांचा निपटारा होईपर्यंत दिवाणी खटल्यांच्या कार्यवाहीला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. सदर आदेशाविरोधात हे अपील दाखल करण्यात आले आहे .

फौजदारी प्रकरणे प्रलंबित राहणे हा दिवाणी खटले पुढे जाण्यास अडथळा ठरणार नाही, असा ठरलेला कायदा आहे. फौजदारी न्यायालय अधिनियमांतर्गत दंडनीय गुन्ह्याचा निपटारा करेल. दुसरीकडे, न्यायालये क्वचितच आणि जेव्हा सक्तीच्या परिस्थितीत त्यांच्या अधिकारांचा वापर करणे आवश्यक असते,फौजदारी खटल्यांना स्थगिती देतात. आतापर्यंत कोणत्याही दिवाणी खटल्याला न्यायालयांनी स्थगिती दिलेली आहे असे प्रकरण आमच्यासमोर आलेले नाही. राजस्थान उच्च न्यायालय हे अशा प्रकारचे आदेश देण्याबाबत अपवाद आहे. आरोपींना दाव्याची सुनावणी पुढे सुरू ठेवण्यास सांगून फौजदारी खटल्यातील त्यांचा बचाव उघड करणे अपेक्षित आहे, या चुकीच्या आधारावर उच्च न्यायालयाने कारवाई केली. हे कायद्याचे योग्य तत्त्व नाही. अन्यथा देखील ते टिकत नाही, कारण त्यापैकी अनेकांनी दिवाणी खटल्यात आपला बचाव दाखल केला आहे. कायद्याचे तत्त्व विचारात घेता उच्च न्यायालयाने अवलंबलेला दृष्टिकोन योग्य नाही, असे आमचे मत आहे. परंतु , बचाव आधीच दाखल केला असल्याने या प्रकरणात काहीही शिल्लक राहिलेले नाही.

त्यानुसार, अपील मंजूर केले जाते. उच्च न्यायालयाचा आदेश रद्द बातल ठरवला जातो.

खर्चाबाबत आदेश नाहीत.

जी.एन. अपील मंजूर .

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x